ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख ११ सप्टेंबर, १९५७ | अंक ३७

## विविध माहिती

**महासागरांना जोडणारा दुसरा कालवा**—अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाच्या व्यापारी नौदल कमिटीचे अध्यक्ष मि. बॉनर ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं पॅसिफिक महासागर व अटलांटिक महासागर ह्यांना जोडणारा दुसरा कालवा कोठे काढतां येईल ह्यासंबंधीं पाहणी करण्यांत येणार आहे. ह्या महासागरांना जोडणारा सध्यांचा पनामा कालवा १९७० च्या सुमारास अपुरा पडणार असल्याची माहितीहि त्यांनीं सांगितली.

**भारतासाठी लढाऊ विमानें**—भारतानें ब्रिटनमधील हंटर ह्या विमानाच्या कारखान्याकडे बऱ्याच लढाऊ विमानांची मागणी नोंदविली आहे. सुमारें १०० ते २०० विमानांची मागणी करण्यांत आली असून त्यांची किंमत ३ कोटी पौंडांपर्यंत असेल. डेन्मार्क, स्वीडन, पेरू, इराक, इत्यादि देशांतील हवाई दलांत कंपनीचीं विमानें वापरण्यांत येतात. विमानें निर्यात करून कंपनीनें १२·६ कोटी पौंड मिळविले आहेत.

**अशुद्ध लोखंडाची निर्यात**—१८७५–७६ सालीं भारतामधून प्रथमच ५ टन अशुद्ध लोखंडाची निर्यात करण्यांत आली. त्याची किंमत अवधी १०० रुपये झाली. गेल्या वर्षी भारतानें १७·९३ लाख टन अशुद्ध लोखंडाची निर्यात केली. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस २० लाख टन अशुद्ध लोखंड निर्यात करण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

**तिरुचिरापल्ली येथील विमानतळ**—तिरुचिरापल्ली येथील विमानतळावर बांधावयाच्या इमारतीचें काम मध्यवर्ती सरकारच्या बांधकाम खात्यानें सुरू केलें आहे. इमारतीसाठी सुमारें ३॥ लाख रुपये खर्च येणार असून ती पुढील वर्षाच्या मध्यापर्यंत पुरी होईल. विमानतळावर येणाऱ्या प्रवाशांची अधिक चांगली सोय करण्यासाठी व कचेरीसाठी ती बांधण्यांत येत आहे.

**कच्छमधील नवें धरण**—भूजपासून ९ मैलावर बांधण्यांत येणाऱ्या रुद्रमाता धरणाचा पायाभरणी समारंभ मुंबई सरकारच्या सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या हस्तें करण्यांत आला. ह्या धरणासाठी ५७ लाख रुपये खर्च येणार आहे. हें धरण कच्छमधील सर्वांत मोठें होईल आणि तें पूर्ण झाल्यावर त्यामधील पाण्यानें १५ हजार एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल.

**अणुशक्तीवर चालणारी चवथी पाणबुडी**—अणुशक्तीवर चालणारी चवथी पाणबुडी अमेरिकेनें तयार केली आहे. नवी बोट नुकतीच पाण्यांत सोडण्यांत आली. तिचें नांव ' सोर्डफिश ' असें ठेवण्यांत आलें आहे. बोटीची लांबी २४० फूट आहे. अशा प्रकारच्या आणखी दोन पाणबुड्या बांधण्याचा अमेरिकेचा विचार आहे. बोटीच्या एंजिनांसाठी अणुशक्तीचा वापर करणारा अमेरिका हा पहिलाच देश आहे.

**अमरेलीजवळ नवें धरण**—मुंबई सरकारनें गुजरातमध्यें अमरेली गांवाजवळ शत्रुंजी ह्या नदीवर धरण बांधण्याचें ठरविलें आहे. धरणासाठी १·५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. धरण पूर्ण झाल्यावर अमरेली व धारी तालुक्यांतील १५ गांवांना त्याचा फायदा मिळेल. १८,००० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होऊं लागून ४,६८० टन अन्नधान्याचें उत्पादन करतां येईल.

**सीलोनमधील मळ्यांचें राष्ट्रीयीकरण**—सीलोनमधील चहाच्या व रबराच्या मळ्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें घाटत आहे असें समजतें. मात्र तुर्त १०० एकरांपेक्षा अधिक मोठ्या असलेल्या मळ्यांनाच राष्ट्रीयीकरणाचा कायदा लागूं करण्यांत येणार आहे. १०० एकरांपेक्षा अधिक मोठे असलेले बहुतेक मळे ब्रिटिश लोकांच्या मालकीचे आहेत. रबराच्या मळ्यांत मात्र सीलोनी नागरिकांची भागीदारी आहे.

**मोटारी हप्त्यानें विकण्यासाठी**—मोटारी हप्त्यानें विकत देण्याची एक योजना भारतामधील मोटार कारखान्यांनीं काढली होती. ही योजना अंमलांत आणण्यासाठी कारखानदारांना आगाऊ पैसे देण्याच्या कल्पनेचा विचार स्टेट बँक करीत आहे अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली.

**कृत्रिम नदी तयार करण्याचा प्रयत्न**—रशिआंतील एका एंजिनिअरानें ऑब ह्या उत्तरवाहिनी नदीला बांध घालून तिचा प्रवाह दक्षिणेकडे वळविण्याची योजना तयार केली आहे. पश्चिम सायबेरिआंत हा बांध घातला जावयाचा असून तेथून ४०० मैल लांबीच्या कालव्यानें पाणी मध्य आशिआंतील ७ कोटी एकर जमिनीला पुरविण्यांत यावयाचें आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**मनमाड येथें रेल्वेवरील पूल**—मनमाड येथील स्टेशनांत रेल्वेमार्ग ओलांडून जाण्यासाठी पूल नाहीं. असा पूल बांधण्यासाठी मुंबई सरकारनें २·५ लाख रुपये मंजूर केले आहेत. पुलासाठी येणाऱ्या खर्चाचा कांहीं भाग मध्यवर्ती सरकार देणार आहे. हा पूल झाल्यावर उतारूंची फार सोय होणार आहे.

**ब्रिटिश पुतळ्यांची मागणी**—भारतांत ब्रिटिश राजवट असतांना राजे, सेनापती व इतर उच्चपदस्थ ब्रिटिश अधिकारी ह्यांचें पुतळे स्मारके म्हणून उभारण्यांत आले होते. ह्या पुतळ्यांची मागणी ऑस्ट्रेलिआंतील कांहीं लोकांकडून करण्यांत येत आहे. भारत सरकारनें हे पुतळे हलविण्याचें ठरविल्यामुळें परदेशीय प्रवाशांना वाटणारें एक आकर्षण कमी होत आहे, असा अभिप्राय व्यक्त करण्यांत येत आहे.

**पेकिंगमधील चित्रपट महोत्सव**—चीनच्या सरकारनें आशिआंतील राष्ट्रांच्या चित्रपटांचा एक महोत्सव पेकिंग येथें भरविला आहे. महोत्सव एक आठवडा चालेल. ह्यासंबंधीं भरविण्यांत आलेल्या समारंभाला १,५०० लोक हजर होते. त्यांत चीनचे मुख्य प्रधान मि. चौ-एन्-लाय होते. परदेशाहून १३ राष्ट्रांचीं प्रतिनिधी मंडळें गेलीं आहेत. त्यांत पाकिस्तान, भारत, ब्रह्मदेश, इंडोनेशिआ व जपान ह्यांचे प्रतिनिधी आहेत.

**ब्रह्मदेशांतील रेल्वे मार्ग**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें आपल्या रेल्वे मार्गाचा विकास करण्याच्या योजना आंखल्या आहेत. त्यासाठी पश्चिम जर्मनी, हंगेरी, इत्यादि देशांकडून रेल्वेचे डबे व इतर साहित्य मोठ्या प्रमाणावर मागविण्यांत येत आहे. विजेवर चालणारीं सहा एंजिनें मागविण्यांत आलीं आहेत. त्यांपैकीं दोन ब्रह्मदेशांत आलीं आहेत. प्रत्येक एंजिनाची किंमत ६ लाख रुपये आहे.

**गोळवाड्यांसाठी परदेशांची मदत**—गोळवाडे स्थापन करून दुधाचा पुरवठा करण्यासाठी ३६·५ लाख रुपयांची मदत परदेशांकडून मिळविण्यांत आली असल्याची माहिती लोकसभेंत सांगण्यात आली, मदत ऑस्ट्रेलिआ, कॅनडा, हॉलंड, न्यूझिलंड व अमेरिका ह्या देशांकडून मिळाली आहे. ह्या मदतींतून मद्रास व कलकत्ता शहरांसाठी दूध पुरवठ्याच्या योजना हातीं घेण्यांत येतील.

**सतारिआचें आगमन**—सुप्रसिद्ध भारतीय सतारें वादनपटू श्री. रविशंकर परदेशांचा दौरा करून परतले. पश्चिम जर्मनींत त्यांना संगीतप्रेमी व संगीतज्ज्ञ अधिक प्रमाणांत भेटले. तबला लावावा कां लागतो व तबलजी माना कां हलवतो, ह्याविषयीं श्रोत्यांना कोडें पडल्याचें त्यांनीं सांगितलें.

**ऑस्ट्रेलिअन गव्हाची खरेदी**—जपान व ऑस्ट्रेलिआ ह्यांच्यांत व्यापारी करार झाल्यापासून जपाननें ऑस्ट्रेलिआकडून ५७,५०० टन गहूं खरेदी केला आहे. जपाननें ह्याच गतीनें गहूं घेतल्यास करार केल्यापासून वर्षाच्या आंत ३,५०,००० टन गहू खरेदी केला जाईल. गव्हासाठी जपान देत असलेली किंमतहि ऑस्ट्रेलिआच्या निर्यात व्यापाऱ्यांना पसंत आहे.


**कमी उत्पन्नाच्या लोकांसाठी घरें**—म्हैसूर राज्याच्या हौसिंग बोर्डानें कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांसाठी घरें बांधण्याचें ठरविलें आहे. हीं घरें महत्त्वाच्या शहरांतून बांधण्यांत येणार आहेत. १९५६-५७ सालासाठी हें काम करण्यास भारत सरकारनें ५० लाख रुपये मंजूर केलें आहेत. एकूण ३३५ घरें बांधण्यांत यावयाचीं आहेत. त्यांपैकीं १३५ बांधून तयार झालीं आहेत.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

सांडू
प्रेग-यूटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक


दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर-मुंबई.


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. ११ सप्टेंबर, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँकेचा सरकारला सौम्य शब्दांत पण निःसंदिग्ध इषारा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआच्या डायरेक्टर बोर्डानें रिझर्व्ह बँक कायद्याच्या ५३ (२) कलमाप्रमाणें ३० जून, १९५७ अखेरचा आपला अहवाल मध्यवर्ती सरकारला सादर केला आहे. ह्या अहवालावरून नेहेमीप्रमाणें आर्थिक परिस्थितीची दिशा दिसून येते. गेल्या वर्षी त्या परिस्थितीला पडलेल्या ताणामुळें किंमती वाढल्या, रहाणीचा खर्च वाढला, पैशाचा तुटवडा पडला आणि परदेशी शिलका अटूं लागल्या. ह्यापैकी महागाई आणि पैशाचा तुटवडा, ह्या गोष्टी गेल्या वर्षीहि होत्याच; पण आयात–निर्गती-मधील वाढत्या तुटीनें भयानक स्वरूप धारण करण्यास प्रारंभ केला, तो एप्रिल १९५६ पासूनच. शेतीचें व कारखान्यांचें उत्पादन वाढलें खरें, परंतु मागणीला तें अपुरेंच पडत होतें. करवाढ, आयातीवर बंधनें, कर्जावर नियंत्रणें, इत्यादि उपायांचा सरकारनें व रिझर्व्ह बँकेनें अवलंब केला.

१९५५–५६ मध्यें शेतीचें उत्पादन त्याआधींच्या वर्षीच्या मानानें थोडें कमीच झालें, त्याचें कारण धान्याच्या उत्पादनांत १६ लक्ष टनांची घट झाली. १९५६–५७ मधील धान्याचें उत्पादन १९५५–५६ चे मानानें ३·६% अधिक होईल, असा अंदाज आहे. शेतीचें एकूण उत्पादनहि ६% नें सुधारण्याची आशा आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत शेतीचें एकूण उत्पादन २८% व त्यापैकी अन्नधान्याचें उत्पादन २५% वाढावयास हवें; गेल्या दोन वर्षांतील चढीच्या किंमती लक्षांत घेतां, ही वाढ झाली नाहीं तर पंचवार्षिक योजनेच्या यशास धोका निर्माण झाल्याविना रहाणार नाहीं.

औद्योगिक उत्पादनाचा इंडेक्स नंतर (१९५१ = १००) १९५५ मध्यें १२२·१ होता, तो १९५६ मध्यें १३३·० झाला; म्हणजे सुमारें ९% वाढला. औद्योगिक उत्पादनाची गति अशीच कायम राहील अशी अपेक्षा आहे.

राष्ट्रीय उत्पन्न १९५४–५५ मध्यें १०,२८० कोटी रु. होतें, तें १९५५–५६ मध्यें १०,४२० कोटी रु. झालें म्हणजे, ह्या उत्पन्नांत फक्त १·४% वाढ झाली. १९५६–५७ मध्यें राष्ट्रीय उत्पन्न ह्यापेक्षा बरेंच वाढावें.

किंमतींचा प्रश्नहि अजून चिंताजनकच आहे. घाऊक किंमतींचा निर्देशांक (१९५२–५३=१००) आणखी ८·३% वाढला; १९५५–५६ मध्यें तो आधींच १३·८% वाढला होता. १९५६–५७ मधील इंडेक्सचा सरासरी आंकडा १९५५–५६ मधील सरासरी आंकड्यापेक्षा १२% अधिक होता. पंचवार्षिक योजनेंतील मोठ्या गुंतवणूकीचा उत्पन्नावर ताण पडल्यामुळें किंमती चढत गेल्या. धान्याच्या उत्पादनांतील घटीनें त्या अडचणींत भरच घातली. धान्याचे साठे करून ठेवण्याची प्रवृत्ति वाढत गेली, त्यामुळेंहि किंमती वरच राहिल्या. भारताच्या सरहद्दीपलीकडील धान्याच्या मागणीचाहि कांहीं अंशीं दुष्परिणाम झाला.

ह्यावर तांतडीचा उपाय म्हणून सरकारनें गहूं व तांदूळ अमेरिकन सरकारकडून आयात केले. सरकारनें धान्याचे साठे ताब्यांत घेण्यासाठी जादा अधिकार स्वतःकडे घेतले. गहूं व तांदूळ ह्यांच्या विभागीय हालचालींवर लक्ष व नियंत्रण ठेवण्यांत आलें. धान्याच्या तारणावरील बँक कर्जावर कडक निर्बंध घातले गेले. तथापि, ह्या परिस्थितीवरील खरा व दीर्घकालीन उपाय उत्पादनवाढ हाच आहे. गेल्या कांहीं महिन्यांत मजुरी व पगार ह्यांत वाढ होण्याविषयीं सर्वत्र मागण्या येत आहेत आणि असंतोष वाढत आहे. रहाणीचा खर्च आटोक्यांत रहाण्याबरोबर उत्पादनाचा खर्चहि मर्यादेंत रहायला हवा. त्यासाठी सर्वच क्षेत्रांत शिस्त आणि आवरशक्ति ह्यांची आवश्यकता आहे.

रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तुत अहवालांत सध्यांच्या आर्थिक परिस्थितीचें दिग्दर्शन सूचक शब्दप्रयोग करून आणि उद्बोधक विशेषणें वापरून करण्यांत आलें आहे. त्या सर्वांचा नीट अर्थ लावला तर आर्थिक परिस्थिति समाधानकारक नाहीं; शेतीचें उत्पादन पांच वर्षांत सव्वापट तरी व्हायला हवें; लोकांच्या मागण्या मर्यादेंत ठेवल्या गेल्या पाहिजेत; थोडक्यांत म्हणजे येतीं कांहीं वर्षें सर्वांनीं पोट बांधूनच आणि अपेक्षा कमी करून कामें केली पाहिजेत असा इषारा लक्षांत येतो. त्यापासून संबंधितांनीं योग्य तो बोध घेतला पाहिजे.

## सारस्वत बँकेची 'महिला शाखा'

सारस्वत को. बँकेची महिला शाखा दि. १५ ऑगस्टपासून सुरू झाली. तिचेसंबंधीं माहिती आम्हीं पृ. २९८वर दिली आहे. सध्यांच्या काळांत स्त्रियांवर जी वाढती जबाबदारी पडत आहे, ती त्या मोठ्या उत्साहानें स्वीकारीत आहेत आणि पतीवरील बोजा सुसह्य करण्यास त्याला मदत करीत आहेत ही अभिनंदनीय गोष्ट आहे. स्त्रियांच्या काटकसरीच्या प्रवृत्तीला कलेचें रूपांतर प्राप्त झालें, तर त्यांच्या कार्याचें चीज अधिक होईल हें उघड आहे. ह्यादृष्टीनें सारस्वत बँकेच्या उपक्रमाचें अभिनंदन केलें पाहिजे. बँकिंगची आवड स्त्री-वर्गात वाढली, बचतीची गुंतवणूक करण्याचें त्यांना समजूं लागलें, म्हणजे त्यांच्या काटकसरीचा आनंद दुणावेल आणि त्यांच्या जीवनांत नवा रस निर्माण होईल. नव्या कायद्यांनीं स्त्रियांच्या आर्थिक हक्कांत क्रांति घडवून आणली आहे; त्या हक्कांचा फायदा त्यांना करून घेतां आला पाहिजे. ह्या दृष्टीनेंहि सारस्वत बँकेची महिला शाखा उपयुक्त कार्य करील, ह्यांत शंका नाहीं. ह्या शाखेंत सर्व कामकाज स्त्रियाच करणार आहेत, त्यामुळें बँकिंगच्या व्यवहारांची जबाबदारी वहाण्याची संधीहि त्यांना मिळणार आहे. सारस्वत बँकेनें महिला शाखा सुरू करून महत्त्वाचा नवा उपक्रम केला आहे. बँकेच्या व्यवस्थापक मंडळांतील स्त्रियांची संख्याहि आतां हळूहळू वाढवत नेली जाईल, अशी अपेक्षा आहे. बँकेच्या महिला शाखेचें सामाजिक महत्त्व विशेष प्रकारचें आहे; तिला सत्वर लोकप्रियता लाभो!

## म्युनिसिपल कर आकारणीसाठी मिळकतीची रक्कम

### घरमालकांवरील अन्याय व घरटंचाई दूर करण्यासाठी कायद्याची तरतूद हवी

( लेखक :—श्री. नारायण विनायक सोंडे, वकील, पुणें. )

म्युनिसिपल कर आकारणीसाठी मिळकतीचें वार्षिक निव्वळ उत्पन्नाची रक्कम ही आधारभूत धरली जाते व सरासरी उत्पन्नांतून दहा टक्के वजा जातां उरलेल्या निव्वळ उत्पन्नावर म्युनिसिपल घरपट्टी, कांहीं शहरांत पाणीपट्टी व सफाईपट्टी आकारली जातें. ' A sum equal to ten per centum of the valuation shall be deducted therefrom in lieu of all allowances for repairs or on any other accounts whatsoever,' असा शब्दप्रयोग १९२५ चा मुंबई म्युनिसिपल बरोज कायदा कलम ७८ ( २ ) व बॉंबे प्रॉ. म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्टमध्यें आहे. १८८८ चें सिटी ऑफ बॉंबे म्युनिसिपल कायद्याचें कलम १५४ ( १ ) यांतहि अशीच तरतूद पहिल्यापासूनच आहे. मूळ एकंदर वट ( ग्रॉस ) उत्पन्नांतून प्रथम म्युनिसिपल कर, सर्वसाधारण कर, पाणी व सफाई पट्टी यांची रक्कम वजा करून बाकी रकमेंतून दहा टक्के वजा जातां उरलेली रक्कम ही आकारणीसाठी वार्षिक निव्वळ रक्कम धरावी असा प्रघात कांहीं म्युनिसिपालिटींत होता अगर आहे. तशा आशयाचा ठराव पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशननें पासहि केला होता, पण तो कार्यवाहीत आणला जात नाहीं. म्युनिसिपल कराची रक्कम वजा करून नंतर सरासरी वार्षिक उत्पन्न आकारणीसाठी धरावें हें करणें कायद्यास अनुसरून नाहीं असा निर्णय पुणें येथील जॉइंट डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टानें नुकताच दिला आहे; व मूळ कायद्यांतील शब्दप्रयोग पाहतां तो बरोबरच आहे.

#### कोर्टाचा स्टॅण्डर्ड रेन्टचा निकाल म्युनिसिपालिटीवर बंधनकारक नाहीं.

पण या योगें घरमालकांवर बराच बोजा वाढतो. तत्त्वतः व व्यवहारतः तसा बोजा असमर्थनीय होय. भाडेंनियंत्रण कायद्याअन्वयें एखाद्या जागेचें स्टॅण्डर्ड रेन्ट म्हणून कोर्टानें ठरविलें व अपिलांत जरी तें कायम झालें, तरीहि म्युनिसिपालिटीवर तें बंधनकारक नाहीं. त्या स्टॅण्डर्ड रेन्टपेक्षाहि जास्त भाडें व उत्पन्न सदर मिळकतीचें आकारणीसाठी धरण्याचा म्युनिसिपालिटीस सरळ अधिकार आहे व असा मुंबई हायकोर्टानें निर्णयहि दिला आहे. वार्षिक सरासरी उत्पन्नाचे १२ टक्केपेक्षा कमी नाहीं इतका जनरल टॅक्स कॉर्पोरेशननें ठेवलाच पाहिजे असा दंडक बॉंबे प्रॉ. म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्टाचें कलम १२९ ( क ) मध्यें घातला. किमान आकारणीस इयत्ता आहे, कमालीस मर्यादा नाहीं. याशिवाय पाणीपट्टी, सफाई पट्टी, अर्बन इम्मुव्हेबल टॅक्स हा वेगळाच. म्हणजे कर १६ ते २० टक्के, तर सूट फक्त दहा टक्के. शिवाय एकाच उत्पन्नावर एकाच संस्थेकडून दुबार कर आकारणी करणें हाहि अन्याय आहे. अलीकडच्या काळांत मिळकतीचा विमा उतरला जातो व सालोसाल हप्त्याची रक्कम ही घरमालकाला द्यावी लागते. गहाणदार सावकार, विशेषतः बँका, फायनान्स कॉर्पोरेशन व लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन, ह्या गहाण मिळकतीचा विमा उतरण्याची अट घरमालक ऋणकोवर अवश्य घालतात व पाळावयासहि भाग पाडतात. प्राप्तीवरील कर आकारणीचे वेळीं विम्याच्या रकमेची उत्पन्नांतून वजावाट होते व एकंदर एकषष्ठांश अथवा सव्वासोळा टक्के वर रकमेंतून उणे करून बाकी उत्पन्नच फक्त प्राप्तीवरील करास पात्र धरलें जातें. अशा स्थितींत घरमालकांना दुबार अन्याय होऊं नये व नवीन इमारती बांधण्यास अथवा भांडवल रक्कम बांधकामांत गुंतविण्यास पराङ्मुख करणारी एक बाब तरी नाहींशी करावी म्हणून " दुरुस्ती व इतर कोणत्याहि कारणाकरितां द्यावयाची रक्कम " जी विद्यमान कायद्यांत फक्त १० टक्के आहे ती निदान १६॥ टक्के तरी वाढविण्याची तरतूद कायद्यांत समाविष्ट करावी. डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्टांत तर ती मुळींच नाहीं. तीहि त्या कायद्यांत घालून छोट्या म्युनिसिपल हद्दींत असलेल्या घरमालकांस या तरतुदींचा फायदा व कायद्याचें संरक्षण द्यावें. तसें केलें नाहीं तर घरटंचाई वाढून प्रत्येकास निवाऱ्याची जागा पुरविण्याचा प्रश्न अधिकच बिकट होईल. समतावादी व समाजवादी म्हणतात कीं, सरकारनें चाळी बांधून सर्वांना राहाण्याची सोय करण्याची जबाबदारी पत्करावी. हें राष्ट्रीयीकरण अशक्य नसलें तर निदान नितांत दूर आहे. सांप्रत नुसती घरटंचाई नाहीं तर राहण्याचे व निवाऱ्याचे जागेचा अभाव असून प्रस्तुत प्रश्नानें भेसूर स्वरूप धारण केलें आहे.

#### तत्त्व व व्यवहार यांची सांगड

कोणी म्हणतात कीं, इकडे ढोबळ वार्षिक भाड्यांतून एकषष्ठांश रकमेची सूट दिल्यास म्युनिसिपालिटी १२ टक्केऐवजीं २० टक्के कर आकारील. मग घरमालकास सवलत ती काय? एकूण एकच. ह्या युक्तिवादास एकच उत्तर व तें हें कीं हल्लींचें १० टक्के वजावाटीचें कलम तरी कायम ठेवून काय करावयाचें? तें व इनकमटॅक्स आकारणीसाठी एकषष्ठांश रक्कम वजावाट करण्याचें कलम हें अजिबात रद्द करून टाका. पण तें जोंपर्यंत रद्द केलें जात नाहीं तोंपर्यंत त्यांत सुधारणा केली पाहिजे. सारांश तत्त्व, न्याय व व्यवहार ह्या सर्वांचा समन्वय करूनच वाजवी संकेत व न्यायपद्धति अंमलांत आणणें हेंच विद्यमान स्थितींत योग्य होय.

---

## हिंदी बँकांच्या कचेऱ्यांत वाढ

हिंदी बँकांच्या कचेऱ्यांत १९५६ मध्यें १०७ ची भर पडून त्यांची संख्या वर्षअखेर ४,१९२ एवढी झाली. युद्धोत्तर काळांत कोणत्याहि वर्षीं बँक कचेऱ्यांत एवढी वाढ झाली नव्हती. १९५६ मध्यें एकूण १५६ नव्या कचेऱ्या काढण्यांत आल्या व ७२ कचेऱ्या बंद करण्यांत आल्या. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ११३ ची भर पडली, तर बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ६ ची घट झाली.

१५६ नव्या कचेऱ्यांची वांटणी अशी झाली:—मुंबई ३६, मद्रास ३४, आंध्रप्रदेश २६, म्हैसूर १३, मध्यप्रदेश १३, बिहार ६, केरळ, राजस्थान, उ. प्रदेश व दिल्ली प्रत्येकी ५, ओरिसा, प. बंगाल प्रत्येकी ३, पंजाब, हिमाचलप्रदेश प्रत्येकी २, आसाम, पॉंडिचेरी, प्रत्येकी १.

७२ बंद पडलेल्या कचेऱ्यांचा तपशील असा आहे:—म्हैसूर १५, उत्तरप्रदेश १३, मुंबई ९, केरळ, मद्रास प्रत्येकी ८, आंध्रप्रदेश ६, राजस्थान ४, आसाम, मध्यप्रदेश, पंजाब प्रत्येकी २, बिहार, प. बंगाल, दिल्ली, प्रत्येकी १.

---

### पंजाब विद्यापीठांत तामीळ भाषेची शाखा सुरू होणार

पंजाब विद्यापीठाच्या सिंडिकेटनें तामीळ भाषेच्या शिक्षणाची शाखा विद्यापीठांत सुरू करण्याचा ठराव मंजूर केला आहे. जरूर त्या प्राध्यापकांची लवकरच नेमणूक केली जाईल.

## भारताची आर्थिक परिस्थिति

(तुलनात्मक आंकडे)

| | १९४८-४९ | १९५६-५७ |
|---|---|---|
| लोकसंख्या (कोटी) | ३४·१० | ३८·३१ |
| राष्ट्रीय उत्पन्न (कोटी रु.) | ८,७१० | १०,४२० |
| दरडोई उत्पन्न (रु.) | २५५ | २७२ |
| घाऊक किंमती (ऑगस्ट १९३९ = १००) | ३७६·२ | ५५९·३ |
| रहाणीचा खर्च [मुंबई] (जून १९३४ = १००) | ३१२ | ३७० |
| औद्योगिक उत्पादन (१९४९-५० = १००) | १००·० | १२३·० |
| धान्याचें उत्पादन (कोटी टन) | ५·४० | ६·६२ |
| पाण्याखालील शेती (कोटी एकर) | ४·८९ | ५·६० |
| विजेचें उत्पादन (कोटी कि. वॅ. तास) | ४६८ | ९८८ |
| आयात [सी. आय. एफ.] (कोटी रु.) | ७६६ | १,०७७ |
| निर्गत [एफ. ओ. बी.] (कोटी रु.) | ४८३ | ६३७ |
| खेळत्या चलनी नोटा (कोटी रु.) | १२३२ | १४९९ |
| परदेशांतील शिलका (कोटी रु.) | १२१५ | ४०२ |
| शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी (कोटी रु.) | ९५१ | १२८४ |
| शेड्यूल्ड बँकांचीं कर्जे (कोटी रु.) | ४४१ | ८८४ |
| बँक रेट (%) | ३ | ४ |

---

## कापडाच्या गिरण्यांची प्रगति

| | १९४८ | १९५६ |
|---|---|---|
| गिरण्यांची संख्या | ४०८ | ४६५ |
| वसूल भांडवल (कोटी रु.) | ७२·९९ | ११५·१५ |
| बसविलेल्या चात्या (लक्ष) | १०३ | १२४ |
| बसविलेले माग | १,९७,४७१ | २,०६,५८० |
| वापरलेली कपास (लक्ष गाठी) | ४२·४ | ४९·० |
| कामगारांची रोजची सरासरी | ६,८६,९२० | ८,३५,४१९ |
| सुताचें उत्पादन (कोटी पौंड) | १४४·९ | १६७·१ |
| कापडाचें उत्पादन (कोटीवार) | ४३१·९ | ५३०·७ |
| सुताची निर्गत (लक्ष पौंड) | ७०·० | १३०·० |
| कापडाची निर्गत (कोटी वार) | ३०·८ | ७४·४ |

---

## एफ. आर. सी. एस. परीक्षेचें कोलंबो केंद्र

एफ. आर. सी. एस. ही परीक्षा कोलंबो येथें मागें घेण्यांत येत असे व भारत, ब्रह्मदेश, मलाया, पाकिस्तान, हाँगकाँग, वगैरे ठिकाणचे विद्यार्थी कोलंबो येथें परीक्षा देत असत. मध्यंतरीं हें परीक्षा केंद्र बंद होतें, तें आतां पुनः सुरू करण्यांत येत आहे. येत्या जानेवारींत ती परीक्षा घेतली जाईल, त्यासाठी रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्सनें नेमलेले परीक्षक मुद्दाम तेथें जातील.

---

## स्वतंत्र मलाया कॉमनवेल्थचा सभासद होणार

मलाया ३१ ऑगस्ट रोजीं स्वतंत्र झाल्यानंतर तो देश 'कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स' चा एक सभासद म्हणून मान्य केला जाईल, असें ब्रिटिश पंतप्रधान मि. हॅरोल्ड मॅकमिलन, ह्यांनीं आधींच जाहीर केलें आहे.


कृष्ण आणि धवल व पुढे फाऊल
ह्या लोकप्रिय व सर्वमान्य पुस्तकांचे लेखक
श्री. वा. काळे
(संपादक, "अर्थ", पुणें ४)
ह्यांचें नवें पुस्तक
तुमचें स्थान कोणतें ?
हें येत्या दिवाळीचे आधीं प्रसिद्ध होईल.
पृ. सं. सुमारें १२०. ★ किंमत २ रुपये.
कौटुंबिक व सामाजिक प्रश्नांची मनमोकळी चर्चा ह्या पुस्तकांत वाचण्यास मिळेल. इष्टमित्रांना श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांच्या देणगीनें आपली रसिकता व्यक्त करा !


## दि फलटण बँक लि., फलटण

१९५६ चें प्रतिवृत्त

"बँकेचे व्यवहार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वाढले असून बँकेनें रिपोर्टाचे सालांत इतर वाढत्या व्यवहाराबरोबरच नुसत्या मालतारणाचे व्यवहारामध्यें एक लाखापेक्षाहि जास्त रक्कम गुंतविली होती. इतक्या मोठ्या प्रमाणावर बँकेनें प्रथमच व्यवहार केला. अहवालाचे वर्षीं बँकेच्या उत्पन्नाचें प्रमाण पुष्कळच वाढलें आहे. गेल्या दोन–तीन वर्षांतील परिस्थितींत पुष्कळसा फरक पडला असून जुन्या नुकसानीच्या बाबी बहुतेक नाहींशा झाल्या असून आतांपावेतों रिझर्व्ह फंड सुरक्षित कायम झाला आहे व भागीदारांना डिव्हिडंड देतां येण्यासारखी परिस्थिति निश्चितपणें निर्माण झाली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस निव्वळ नफा १४६ रु. झाला."

वसूल भांडवल ५५,८४० रु.; जनरल रिझर्व्ह २६,५९५ रु.; ठेवी १,४२,०७० रु.; रोख ५५,४७१ रु., बँकांत ८८,३५५ रु.; इन्व्हेस्टमेंट १५,०५० रु.; कर्जें ६०,८८८ रु.; असे ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. संशयित अगर बुडित कर्जें (ज्याकरितां तरतूद केलेली नाहीं, अशीं) फक्त ९२ रुपयांचीं आहेत. वार्षिक सभा २१–९–१९५७ रोजीं भरणार आहे.

---

## हिंदी बँकांच्या भारताबाहेरील कचेऱ्या

| देश | बँका | त्यांच्या कचेऱ्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| एडन | १ | १ |
| ब्रि. पूर्व आफ्रिका | २ | ९ |
| ब्रह्मदेश | ५ | ९ |
| सिलोन | ३ | ३ |
| हाँगकाँग | २ | २ |
| जपान | १ | २ |
| मलाया | ४ | १३ |
| पाकिस्तान | २७ | ६३ |
| थायलंड | १ | १ |
| ग्रेटब्रिटन | ४ | ४ |
| एकूण | - | १०७ |

## सारस्वत को. बँकेची अभिनव योजना

# " महिला शाखा "

### फक्त स्त्रियांना प्रवेश; स्त्रियांचींच खातीं; सर्व कामकाज स्त्रियाच पाहणार

सांसारिक जीवनांत स्त्रीची जबाबदारी पुरुषाप्रमाणेंच किंबहुना पुरुषापेक्षाहि जास्त असते. ती नोकरी करणारी असो वा नसो, गृहिणी या दृष्टीनें तिची फार मोठी जबाबदारी असते. संसाराचें नंदनवन वा माळरान बनविणें सर्वस्वीं तिच्या हातीं असतें. धकाधकीच्या दैनंदिन रगाड्यांत पुरुषवर्गाला आजकाल उसंत कमी मिळूं लागली आहे. अशा वेळीं संसाराच्या व मुलाबाळांच्या भावी कल्याणाच्या दृष्टीनें शांतपणें विचार करून कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा दूरदर्शीपणानें निर्णय घेणें तिचें कर्तव्य ठरतें. ही दूरदृष्टि ठेवून वागणारी स्त्रीच खऱ्या अर्थानें गृहिणी होय.

### बचतीच्या नैसर्गिक वृत्तीचें कलेंत रूपांतर

स्त्री ही स्वभावतःच काटकसरी असते. तिनें मनांत आणलें तर सांसारिक खर्चातील अनावश्यक बाबतींना काट मारून ती बचत करूं शकेल. दर महिन्याच्या बचतीचा हा आंकडा लहानसहानच असला तरी " थेंबें थेंबें तळें सांचे " या न्यायानें कांहीं महिन्यांनीं, कांहीं वर्षांनीं तो आंकडा फुगत जाईल. फक्त 'बचतीची कला' अंगीं बाणून घेतली पाहिजे. म्हणजे कालांतरानें वाढलेली ही रक्कम संसाराच्या आणि मुलाबाळांच्या भावी कल्याणाचा एक बहुमोल ठेवा ठरतो, आणि तोहि हंसतखेळत.

### सारस्वत बँकेची " महिला शाखा "

स्त्रियांना अवगत असलेली बचतीची कला सत्कारणीं लागावी व परिणामी त्याचें सुयोग्य फल त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या पदरांत पडावें म्हणून सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेनें एक अभिनव योजना आंखलेली आहे. ही योजना म्हणजे बँकेची " महिला शाखा. " या शाखेचें सर्व कामकाज स्त्रियाच करतात. ही शाखा फक्त स्त्रियांसाठीच उघडी राहील व स्त्रियांनाच यांत खातीं उघडतां येतील. महिला शाखेच्या कामकाजाच्या वेळांत फक्त स्त्रियांनाच प्रवेश मिळेल. या शाखेचें कार्यालय, प्रथमतः मुख्य कचेरीच्या जागेंतच राहील व कामकाजाची वेळ रोज दुपारीं २॥ ते ४॥ असेल. ही शाखा इतर शाखांप्रमाणेंच सोमवार ते शनिवार उघडी राहील आणि रविवारीं व बँक-सुट्टीच्या दिवशीं बंद राहील.

### बचतीच्या आकर्षक योजना

बँकेनें अनेक बचतीच्या योजना सादर केल्या असून त्या अत्यंत लोकप्रिय झालेल्या आहेत. या योजनांचें आकर्षण काय आहे, त्यांत बचतीच्या रूपानें गुंतविलेला पैसा ठराविक काळांत व्याजाची भर पडून कसा वाढीस लागतो, वगैरे सर्व गोष्टी बँकेचा महिला नोकरवर्ग या शाखेंतील स्त्री खातेदारांना नीट समजावून देईल.

बचत योजनांत एकीच्या व अनेकींच्या नांवें एकच खातें उघडण्याची मुभा आहे. पैसे काढावयाचे झाल्यास ते एक अगर अनेक खातेदाराला काढतां येतील. बँकेच्या इतर सर्व सोयी या शाखेमार्फतहि मिळूं शकतील.

बँकेची सभासद असलेल्या स्त्री सभासदांपैकी कुणाला शिक्षणासाठीं, आजारीपणासाठीं, लहान धंद्यांना माल विकत घेण्यासाठी पैशाची गरज भासल्यास बँकेकडून ती भागविली जाईल.

अशा तऱ्हेनें बचत करून ठेवीदार स्वतःचा फायदा करून घेतीलच पण अप्रत्यक्ष रीतीनें देशाच्या भरभराटीलाहि या बचतीनें त्यांना हातभार लावतां येईल.

---

**बड्या अधिकाऱ्यांना सूचना**—भारत सरकारच्या निरनिराळ्या खात्याच्या चिटणिसांनीं आपल्या खात्यांतील दरमहा १,००० रुपयांपेक्षा अधिक पगार मिळविणाऱ्या अधिकाऱ्यांना उद्देशून एक परिपत्रक काढलें आहे. ह्या अधिकाऱ्यांनीं आपल्या पगाराची ५ टक्के रक्कम नॅशनल सेव्हिंग्जमध्यें गुंतवावी असें सुचविण्यांत आलें आहे. भारत सरकारचे सुमारें २,५०० नोकर दरमहा १,००० रुपयांपेक्षा अधिक पगार घेतात.

**रशिआकडून आणखी कर्ज**—भारतांत भारी उद्योगधंदे काढण्यासाठीं रशिआनें ५० कोटी रुबल्सचें कर्ज ह्यापूर्वी दिलेलें आहे. आतां आणखी १० कोटी रुबल्सचें कर्ज देण्याची तयारी दाखविण्यांत आल्याचें समजतें. ह्या कर्जाचा उपयोग भारतांत औषधांचें उत्पादन करण्यासाठीं होईल. भारत सरकारला अजून ह्यासंबंधीं विचार करावयाचा आहे.

**केरळ राज्याचा इतिहास**—केरळ साहित्य ॲकॅडमीनें राज्याचा इतिहास लिहिण्याचें ठरविलें आहे. प्रथम उपलब्ध साहित्याचा आणि ऐतिहासिक मदतीचा उपयोग करून एक छोटासा इतिहास प्रसिद्ध करण्यांत येईल. नंतर अधिक संशोधन करून मोठा इतिहास तयार करण्यांत येईल. संस्थेची मुख्य कचेरी त्रिचूर येथें राहणार आहे.

**कामगार संघटनांच्या वाढीसाठी**—अविकसित देशांत कामगार संघटना अधिक प्रमाणावर वाढाव्या म्हणून युरोपमधील कामगार-संघटनांनीं एक फंड काढलेला आहे. ह्या फंडाला मदत करण्यासाठीं ५ लाख पौंड जमविण्यांत यावेत असा ठराव ब्रिटिश ट्रेड युनिअन काँग्रेसनें मंजूर केला आहे.

**अमेरिकेकडून मिळालेला तांदूळ**—१९५७ च्या जूनअखेर संपलेल्या वर्षांत अमेरिकेनें भारताला १ लाख, ९० हजार टन तांदूळ पुरविला. ह्या वर्षांत भारतानें आयात केलेल्या तांदुळापैकी हा तांदूळ २२ टक्के भरतो. एकूण ८ लाख, ५० हजार टन तांदळाची आयात करण्यांत आली. भारतांत दरसाल तांदुळाच्या होणाऱ्या एकूण उत्पादनाशी आयातीचें प्रमाण १·५ टक्के पडतें.

---



## बार्शी सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

# नोटीस

( फक्त सभासदांकरितां )

या बँकेची वार्षिक साधारण सभा दिनांक २९ सप्टेंबर १९५७ रविवार रोजीं दुपारीं ४ वाजतां बार्शी येथें बँकेचे जागेंत भरणार आहे. त्यावेळीं ता. ३०-६-५७ रोजीं संपलेल्या वर्षाचे तपासलेले ताळेबंद, नफातोटा-पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणें, नफ्याची वांटणी मंजूर करणें, हिशेब तपासनिसांची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणें, डायरेक्टरांचे निवडणुकीचे निकाल जाहीर करणें, चेअरमन व व्हाईस चेअरमन यांची निवड करणें, रिपोर्टांत नमूद केलेले पोटनियम दुरुस्त करणें व स्वीकारणें वगैरे व मे. चेअरमनसाहेब यांचे परवानगीनें इतर कामें होतील.

तरी या बँकेचे सर्व सभासदांनीं अवश्य उपस्थित रहावें अशी विनंती आहे.

बार्शी ता. ९-९-५७

संचालक मंडळाचे आज्ञेनुसार
वि. प. रेडे
मॅनेजर

### रशिआची ब्रह्मदेशाला आर्थिक मदत

१९५५ साल अखेर रशिआचे पुढारी माईल बुल्गानिन व निकिता क्रुश्चेव्ह भारताप्रमाणेंच ब्रह्मदेशालाहि भेट देऊन गेले. त्यांनीं आपल्या भेटींत ब्रह्मदेशाला कांहीं आर्थिक मदत देण्याची तयारी दाखविली होती. त्यावेळीं झालेल्या विचारविनिमयाची पुढची पायरी म्हणून सोव्हिएट रशिआ व ब्रह्मदेश ह्यांच्या दरम्यान आतां एक करार करण्यांत आला आहे. ह्या करारास अनुसरून रशिआनें ब्रह्मदेशाच्या कांहीं आर्थिक योजनांना साह्य करण्याचें ठरविलें आहे. ह्या मदतीच्या बदला ब्रह्मदेश रशिआला तांदूळ आणि इतर कांहीं माल देणार आहे. ब्रिटिश राजवटीखाली ब्रह्मदेशाचा आर्थिक विकास बेताचाच झाला. औद्योगिक विकास न झाल्यामुळें उत्पादनाचें आधुनिक तंत्रहि तेथें रुजलें नाहीं. त्यांत पुन्हां दुसऱ्या महायुद्धाची प्रत्यक्ष झळ ब्रह्मदेशाला सोसावी लागली. त्यामुळें औद्योगिक विकासाबरोबरच तांत्रिक शिक्षण देण्याची व्यवस्था करणें विशेष जरूरीचें झालें आहे. रशिआ व ब्रह्मदेश ह्यांच्यांत नुकत्याच झालेल्या कराराप्रमाणें आधुनिक पद्धतीची एक तांत्रिक शिक्षणसंस्था स्थापन करण्यास अग्रस्थान देण्यांत आलें आहे. ही नवीन संस्था रंगून जवळ काढण्यांत येणार असून तीमध्यें १,५०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत येईल. त्याशिवाय पदवीनंतरच्या अभ्यासाचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे. विद्यार्थी व शिक्षक ह्यांची राहण्याची व्यवस्थाहि करण्यांत येईल. २०६ खोल्या असलेलें एक होटेलहि रशिआ बांधून देणार आहे. ह्या ठिकाणीं सिनेमा, रेस्टॉरंट, दुकानें, इत्यादि सोयी करण्यांत येणार आहेत. दक्षिण ब्रह्मदेशांतील शान संस्थानांत एक इस्पितळ बांधण्यांत येणार आहे. इस्पितळांत २०० रोग्यांची रहाण्याची सोय करण्यांत येईल आणि बाहेरून येणाऱ्या रोग्यांची नुसत्या औषधोपचाराची तजवीज होईल.

### रेल्वेच्या वाहतुकीच्या सामर्थ्यांत वाढ झाली पाहिजे

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारतामधील रेल्वेच्या वाहतुकीवर खूपच ताण पडणार आहे. १९५५–५६ सालीं रेल्वेजनीं ११·५ कोटी टन माल वाहून नेला. त्या सालीं आणखी ५० लाख टन माल वाहून नेण्याची जरुरी असतांना रेल्वे ते काम करूं शकल्या नाहींत. गेल्या सालीं रेल्वेजनीं १२·६ कोटी टन माल वाहून नेला. पुढच्या वर्षीं माल–वाहतुकीच्या गरजेंत आणखी वाढ होणार आहे आणि १९५९ सालीं ही गरज शिगेला पोंचणार आहे. कारण, त्यावर्षी नवीन पोलादाचे कारखाने प्रत्यक्ष उत्पादन करूं लागणार आहेत. वहातुकीचें सामर्थ्य वाढविण्याचा जो कार्यक्रम सध्यां आंखण्यांत आला आहे त्यासाठी १,१२५ कोटी रुपये खर्च येणार आहे. ह्या कार्यक्रमाप्रमाणें १९६१ च्या सुमारास सध्यांपेक्षा ४·२ कोटी टनांची अधिक वाहतूक करण्याचें ठरलें आहे. पण तो कार्यक्रम पार पडला तरी गरजेच्या मानानें अपुराच पडणार आहे. कारण त्या सुमारास ६ ते ७ कोटी टन अधिक वाहतूक करावी लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस वाहतुकीचें सामर्थ्य १८ कोटी टनापर्यंत वाढविण्यांत यावें असें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें आहे. तें गांठण्यासाठी रेल्वेला आणखी १०० कोटी रुपयांची जरूर लागेल. रेल्वेला लागणाऱ्या सामानाच्या किंमतींत वाढ झाल्यामुळें मूळच्या कार्यक्रमासाठींच १०० कोटी रुपये अधिक लागणार आहेत, ते वेगळेंच. नव्यानें लागणाऱ्या १०० कोटींच्या रकमेपैकी कांहीं रक्कम परदेशीय हुंडणावळीच्या रूपांत लागणार आहे. रेल्वेचीं एंजिनें व सिग्नलिंगचें साहित्य ह्यासाठीं हुंडणावळीची विशेष गरज आहे. त्याशिवाय मालवाहू डब्यांसाठीं पोलादाहि लागणार आहे.

### सीलोन सरकारचें बोलपटाच्या धंद्याला साह्य

सिंहली भाषेंतील बोलपट निर्माण करण्यासाठीं सीलोनच्या सरकारनें खाजगी भांडवलदारांशीं सहकार्य करण्याचें ठरविलें आहे. ह्या सहकार्याचें दृश्य स्वरूप म्हणजे खाजगी भांडवलदारांची मदत घेऊन कोलंबोजवळ चित्रपट निर्माण करण्याचा एक स्टुडिओ उभारण्याचा सरकारचा निश्चय. संकल्पित स्टुडिओ अद्यावत् साधनांनीं परिपूर्ण करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यामध्यें दरसाल १५ चित्रपट निर्माण करतां येतील असा अंदाज करण्यांत आला आहे. एकाच वेळीं तीन वेगळाल्या चित्रपटांचें काम चालूं शकेल, अशा रीतीनें तो बांधण्यांत येणार आहे. त्यावरून त्याच्या भव्यतेची कल्पना करतां येईल. सरकारच्या व खाजगी भांडवलदारांच्या संयुक्त मालकीच्या ह्या कंपनीनें निर्मात्यांना सढळ अटीवर चित्रपट निर्माण करण्यास उत्तेजन द्यावें अशी सरकारची अपेक्षा आहे. सध्यां अशी परिस्थिति आहे कीं, सिंहली भाषेंत बोलपट काढणाऱ्या बहुतेक निर्मात्यांना भारतामधील स्टुडिओंचा उपयोग करून घ्यावा लागतो. सीलोनच्या उद्योगखात्यानें स्थानिकरीत्या चित्रपटांची निर्मिति व्हावी म्हणून सर्व प्रकारच्या सवलती देण्याचें कबूल केलें आहे. सध्यां सिंहली चित्रपट भारतामधील स्टुडिओंतून तयार करण्यांत येत असल्यानें विदेशी चलन द्यावें लागत आहे आणि शिवाय सिंहली चित्रपटांत भारतीय संस्कृति आणि संगीत ह्यांना प्राधान्य द्यावें लागतें अशी सीलोन सरकारची तक्रार आहे. म्हणून सिंहली चित्रपट सीलोनमध्येंच तयार करण्यांत यावेत असा सरकारचा आग्रह आहे. एका खाजगी निर्मात्यानें तर सरकारला असाहि सल्ला दिला होता कीं, ह्याबाबतींत कडक धोरण स्वीकारून भारतामध्यें सिंहली चित्रपट तयार करवून घेण्यास बंदीच घालण्यांत यावी.

### महाराष्ट्र बँकेचा ट्रेनिंग क्लास

आपल्या नोकरवर्गाची कार्यक्षमता वाढविण्यासाठीं एक ट्रेनिंग क्लास महाराष्ट्र बँकेनें सुरू केला आहे, त्याचा प्रारंभ बँकेचे मॅनेजर श्री. चिं. वि. जोग ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानें दि. १५ ऑगस्ट रोजीं झाला. २५ तारखेपासून वक्तशीर वर्ग भरूं लागले आहेत असें समजतें.

स्त्रियांना अवगत असलेली बचतीची कला सत्कारणीं लागावी व परिणामीं त्याचें सुयोग्य फल त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या पदरांत पडावें यासाठीं आखलेली एक अभिनव योजना म्हणजेच -

**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेची**

**महिला शाखा**

ता. १५ ऑगस्टपासून सुरू झाली.

| -: कार्यालय :- | –कामाच्या वेळा– |
|---|---|
| सारस्वत बँक गृह, | दररोज |
| गिरगांव, मुंबई ४. | २॥ ते ४॥ |

रविवार व सुटीच्या दिवशीं बँक बंद

सविस्तर माहिती शाखाधिकाऱ्याकडे मिळेल.

## शेड्यूल्ड बँकांची वर्गवारी

### राज्यें, लोकसंख्या, ठेवी व कर्जें ह्याबाबत तुलना

| राज्यें | लोकसंख्या | बँक कचेऱ्या | प्रत्येक कचेरीमागील लोकसंख्या | ठेवी (लक्ष रु.) | ठेवींचें एकूण ठेवींशीं प्रमाण % | कर्जें (लक्ष रु.) | कर्जांचें एकूण कर्जांशीं प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| आंध्रप्रदेश | ३,२२,००,००० | २३७ | १,३५,८६५ | ३५·६६ | ३ | ३१·५७ | ४ |
| आसाम | ९०,००,००० | २२ | ४,०९,०९१ | ७·२१ | १ | १·९८ | — |
| बिहार | ३,८९,००,००० | १३१ | २,९६,९४७ | ३१·४४ | ३ | १४·४९ | २ |
| मुंबई | ४,७८,००,००० | ५९१ | ८०,८८० | ३६३·१० | ३३ | २७०·६३ | ३५ |
| केरळ | १,३६,००,००० | १७४ | ७८,१६१ | ३५·०४ | ३ | १७·८५ | २ |
| मध्यप्रदेश | २,६१,००,००० | १४७ | १,७७,५५१ | २५·२१ | २ | १५·६१ | २ |
| मद्रास | ३,००,००,००० | ३७० | ८१,०८१ | ७६·९५ | ७ | ७४·२२ | १० |
| म्हैसूर | १,९०,००,००० | २३९ | ७९,४९८ | ३७·७१ | ३ | २१·८३ | ३ |
| ओरिसा | १,४६,००,००७ | १६ | ९,१२,५०० | ३,३४ | — | ६९ | — |
| पंजाब | १,६०,००,ò०० | २१५ | ७४,४१९ | ५६·९० | ५ | १७·६४ | २ |
| राजस्थान | १,६०,००,००० | १२५ | १,२८,००० | २६·१९ | २ | १६·६७ | २ |
| उत्तर प्रदेश | ६,३२,००,००६ | ३७७ | १,६७,६३९ | ८३·१४ | ८ | ५४·३३ | ७ |
| प. बंगाल | २,६२,००,००० | १८४ | १,४२,३९१ | २२५·४८ | २१ | २१६·२२ | २८ |
| जम्मू-काश्मीर | ४४,००,००० | ९ | ४,८८,८८९ | ६·०६ | १ | २४ | — |
| दिल्ली | १७,००,००० | ९६ | १७,७०८ | ७९·४८ | ७ | २३·१९ | ३ |
| हिमाचल प्रदेश | १०,००,००० | ७ | १,४२,८५७ | ६४ | — | ४ | — |
| पाँडिचेरी | ८३,००० | ५ | १६,६०० | १,६८ | — | १·४० | — |
| त्रिपुरा | ६,००,००० | २ | ३,००,००० | ३८ | — | २ | — |
| एकूण | ३६,०३,८३,००० | २,९४७ | १,२२,२८८ | १,०९५,६१ | | ७७८,६२ | — |

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक :– श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

સુખી જીવનની પગદંડી
( ગૃહજીવનનું માંગલ્ય )
લેખકઃ—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"
ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂ. ૧–૮–૦

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *
( शिड्यूल्ड बँक )
हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )
अध्यक्ष श्री. ग. रा. साठे
अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५
खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००
उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट
★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज २॥ टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.